9

# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

## विशेष कक्ष

## परिपत्रक क्र. ०२/२०२२

विषय : सर्व संलग्नित महाविद्यालये/शैक्षणिक संस्था यांमधील ग्रंथपाल, शा.शि.संचालक यांच्यासह सहाय्यक प्राध्यापक पदांच्या बिंदूनामावली प्राथमिक तपासणी करून घेणेबाबत...

संदर्भ : १. शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०२१/प्र.क्र.३८७/१६—ब(ए), दि.०६/०७/२०२१.
२. शासन निर्णय क्रमांक : आढावा-१५१३/प्र.क्र.१२५(भाग-८)/म.शि.५, दि.१२/११/२०२१.
३. शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१६/ प्र.क्र.२२८ए/१८/१६-ब, दि.२५/०२/२०२२.
४. महाराष्ट्र शासन अधिसूचना : दि.०७/०४/२०२२
५. शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१, दि.११/०४/२०२१
६. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांचे पत्र दि.२५/०४/२०२२
७. अवर सचिव, उच्च व तंत्र विभाग, महाराष्ट्र शासन यांचे जा.क्र.संकिर्ण—२२०५/प्र.क्र.९८/विशि—१ दि.२४/०६/२०२२
८. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग यांचे जा.क्र. विससं/कोवि/सांगली अनु./२०२२—२३/३३६ दि.२४/०६/२०२२

उपरोक्त विषय व संदर्भीय शासननिर्णयास अनुसरून शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर या विद्यपीठाशी संलग्नित सर्व अशासकिय अनुदानित महाविद्यालये/शैक्षणिक संस्था यांना कळविण्यात येते की, महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या भरती प्रक्रियेसाठी ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक, यांचे सह सहाय्यक प्राध्यापकांच्या पदांची संवर्गनिहाय प्राथमिक बिंदुनामावली तपासणी आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तीनही जिल्हयांमधील सर्व संलग्नित अशासकिय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक पदांच्या बिंदुनामावलीची **प्राथमिक तपासणी** करून देण्यासाठी विशेष कक्षाकडून खालीलप्रमाणे आयोजन करण्यात येत आहे.

- बैठक कक्ष क्र. ३०२, दुसरा मजला, प्रशासकीय इमारत, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे कार्यालयीन वेळेत प्रत्येक दिवशी एकुण १० महाविद्यालयांच्या बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी करून देण्यात येईल. त्याचे वेळापत्रक सोबत जोडलेले आहे.
- **बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी करतेवेळी मावक, पुणे कार्यालयाने आपल्या वेबसाईटवर दिलेली बिंदूनामावलीच्या तपासणी करीता आवश्यक सर्व परिशिष्ठे (आपआपल्या महाविद्यालयास शिक्षक मंजूर पदसंख्येप्रमाणे लागू होणाऱ्या अ,ब,क परिशिष्ठासह)व तद्अनुषंगिक कागदपत्रे तयार करूनच यावे, जेणेकरून सदर कामकाज करणे सोईचे होईल.**

प्राथमिक तपासणी झाल्यानंतर **तात्काळ** संदर्भीय शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार कार्यक्षेत्रातील महाविद्यालये /शैक्षणिक संस्था यांनी मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, (मावक), पुणे यांचेकडून प्रमाणित (**अंतिम तपासणी**) करून घेणेची आहे.

### बिंदुनामावली तपासणीच्या वेळी खालील माहिती सादर करण्यात यावी:

१. सर्व संलग्नीत अनुदानित महाविद्यालयांनी पदमान्यतेबाबतचे (दिनांक ०१/१०/२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय) पत्र सादर करणे आवश्यक आहे.

२. उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय क्र. १ अन्वये सुधारित १०० बिंदुनामावली शासनाने निर्गमित केलेली असून त्यानुसार पुनःश्च नवीन बिंदुनामावली तयार करावयाची असल्याने तपासणीकरीता येतेवेळी (A-3 साईझ लेजर कागदावर छपाईसह स्पायरल बायडिंग करुन ) दोन बिंदुनामावली नोंदवहया अध्यक्ष/सचिव यांच्या सही शिक्क्यासह सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे.

३. दि.०२/०७/१९९७ रोजी कार्यरत असलेले व त्यानंतरच्या नव्याने नियुक्त होउन आजतागायत बिंदुनामावलीमध्ये असलेल्या नोंदीप्रमाणे ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालकांचा समावेश करुन त्यासह कार्यरत शिक्षकांची प्रवर्गनिहाय व रुजु दिनांकापासून चढत्याक्रमाने (विषय नमुद करुन) जेष्ठता यादी सादर करावी.

४. यापूर्वी तपासून घेतलेल्या आरक्षणानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती उदा. निवडसमिती अहवालाची प्रत, शिक्षक मान्यतेचे पत्र तसेच पदे भरण्याची कार्यवाही झाली नसल्यास किंवा निवड झालेला उमेदवार रूजू झालेला नसेल तर याबाबतची कागदपत्रे यासोबतच राजीनामा/निधन झाले असल्यास तद्अनूषंगिक कागदपत्रे खुलाश्यासह सोबत सादर करावीत. कार्यरत असलेल्या सर्व शिक्षकांच्या शिक्षक मान्यतेच्या प्रतीची एक छायांकित प्रत सादर करावी.

५. बिंदुनामावलीत कार्यरत असणाऱ्या तसेच विद्यापीठ निवड समितीने निवडलेल्या कायम स्वरूपी शिक्षकांच्याच नोंदीचा सामावेश करण्यात यावा. सदर नोंदी पूर्ण व स्पष्ट असाव्यात. खाडाखोड किंवा व्हाईट इंक वापरलेली चालणार नाही.

६. बिंदुनामावलीमध्ये नमूद करण्यात आलेल्या ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालकासह कायमस्वरूपी शिक्षकांच्या मान्यता पत्राच्या छायांकित प्रती सादर करण्यात याव्यात.

७. ज्या महाविद्यालयामधील ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालकासह सर्व शिक्षक पदे भरलेली आहेत. अशा महाविद्यालयांनी पूर्ण पदे भरल्याबाबत या कार्यालयास कळविणे बंधनकारक आहे.

८. सोबत देणेत आलेली दिव्यांग व महिला आरक्षणाबाबतची प्रपत्रे तयार करुन बिंदूनामावली सोबत सादर करावयाची आहेत.

९. संस्था/महाविद्यालयांनी बिंदूनामावली प्राथमिक तपासणीकरीता, नियुक्ती प्राधिकारी यांचे अधिकारपत्र देवून बिंदूनामावलीचे काम पाहणाऱ्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनांच पाठविणेत यावे.

१०. कोविड–१९ प्रतिबंधक नियमांच्या अधिन राहून सदर बिंदूनामावली प्राथमिक तपासणी शिबीर आयोजित करण्यात आलेले असून महाविद्यालय/संस्थेने कोविड प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करुन जास्तीत जास्त दोन माहितगार व्यक्ती यावेळी हजर राहतील, याची दक्षता घेण्यात यावी.

PSPande.

उपकुलसचिव,
तथा
प्राथमिक बिंदुनामावली तपासणी अधिकारी
विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जा.क्र. विशेष कक्ष/बिंदुनामावली शिबीर/जुलै२०२२/७३५

दिनांक: ३०/०६/२०२२

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:—**

मा. प्राचार्य , शिवाजी शिवाजी विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/शैक्षणिक संस्था.

**सोबत :— वरीलप्रमाणे...**

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, Special Cell –(0231) 2609148
Website - www.unishivaji.ac.in E-mail - spcell@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४, महाराष्ट्र
विशेष कक्ष
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, विशेष कक्ष – (०२३१)२६०९१४८
वेबसाईट – www.unishivaji.ac.in ई–मेल– spcell@unishivaji.ac.in
Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

## अशासकीय अनुदानित महाविद्यालये बिंदुनामावली प्राथमिक तपासणी शिबीर जुलै – २०२२ वेळापत्रक

| अ. क्र. | दिनांक | पहिले सत्र सकाळी १०:३० ते ०२:०० | दुसरे सत्र दुपारी ०२:३० ते ०६:०० |
|---|---|---|---|
| १ | ०४/०७/२०२२ | १. कौन्सिल ऑफ एज्युकेशन, कोल्हापूर (३ महाविद्यालये)<br>२. फलटण एज्युकेशन सोसायटी, फलटण, जि.सातारा (२ महाविद्यालये)<br>३. श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटी, कराड (२ महाविद्यालये) | १. के.बी.पी. कॉलेज,इस्लामपूर<br>२. न्यु कॉलेज, कोल्हापूर<br>३. कमला कॉलेज, कोल्हापूर |
| २ | ०५/०७/२०२२ | १. आजरा महाविद्यालय, आजरा<br>२. डॉ.घाळी महाविद्यालय, गडहिंग्लज<br>३. यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी<br>४. शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज<br>५. र.भा.माडखोलकर महाविद्यालय, चंदगड | १. कन्या महाविद्यालय,मिरज<br>२. मिरज महाविद्यालय,मिरज<br>३. देशभक्त आनंदराव नाईक, महाविद्यालय, चिखली<br>४. छ.शाहू इन्स्टि. ऑफ बिझनेस एज्युकेशन, (सायबर), कोल्हापूर<br>५. के.एम.सी.कॉलेज, कोल्हापूर |
| ३ | ०६/०७/२०२२ | १. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कवठेमहांकाळ<br>२. बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी<br>३. आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, पलूस, जि.सांगली<br>४. शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि.सातारा<br>५. राजा भगवंतराव महाविद्यालय, औंध, जि.सातारा | १. डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,पेठ–वडगांव<br>२. श्री. विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठ–वडगांव<br>३. कृष्णा महाविद्यालय, रेठरे<br>४. प.पु.स्वामी विवेकानंद सेवाश्रम शिक्षण संस्था, शिराळा, जि.सांगली (२ महाविद्यालये)<br>५. यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | ०७/०७/२०२२ | १. किसनवीर महाविद्यालय,वाई<br>२. बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण<br>३. दूधसाखर महाविद्यालय, बिद्री<br>४. कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी<br>५. म.ह.शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता.गगनबावडा | १. भोगावती महाविद्यालय, कुरुकली<br>२. राधानगरी महाविद्यालय, राधानगरी<br>३. सहकारभुषण एस.के.पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड<br>४. नाईट कॉलेज, इचलकरंजी<br>५. यशवंतराव पाटील सायन्स कॉलेज, सोळांकूर |
| ५ | ०८/०७/२०२२ | उपरोक्त कालावधीत प्राथमिक तपासणी करतेवेळी निदर्शनास आलेल्या त्रुटींची पुर्तता करुन महाविद्यालयांनी प्रस्ताव हया तारखेला पुन:सादर करावेत जेणेकरुन संबंधित बिंदुनामावलीच्या प्राथमिक तपासणीचे काम पुर्ण करतील. | |

टिप :— संस्थेच्या नियुक्ती प्राधिकारी यांचे अधिकार—पत्र घेवून बिंदूनामावलीबाबत माहितगार शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आपल्या क्रमांकानुसार तपासणी हॉलमध्ये (कक्ष क्र.३०२) वेळेवर उपस्थित राहावे.

PSPande.

उपकुलसचिव,
तथा
प्राथमिक बिंदुनामावली तपासणी अधिकारी
विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संस्थेचे नाव :—

महाविद्यालयाचे नाव :—

## दिनांक ३१/०५/२०२२ अखेर दिव्यांग प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदांच्या माहितीचा गोषवारा

| | | | | | दिव्यांग पदांची माहिती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रिक्त पदसंख्येच्या ४% नुसार जाणारी दिव्यांग पदे | कार्यरत दिव्यांग पदसंख्या | | | | | |
| अ.क्र | पदनाम | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे | | अ | ब | क | ड | इ | दिव्यांग रिक्त पदे |
| १. | प्राचार्य / संचालक | | | | | | | | | | |
| २. | सहायक प्राध्यापक, गंथपाल, शा.शि. संचालक | | | | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | | | | |

---

दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार दिव्यांगाच्या पद भरतीची माहिती ठेवण्यासाठी बिंदुनामावलीचा विहीत नमुना

| भरती वर्ष | पदाचे नांव | रोटेशन क्रमांक | बिंदु क्रमांक | दिव्यांगाच्या खालील विविध प्रकारांपैकी विहीत दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीसाठी सुनिश्चित करण्यात आलेले आहे काय | | | | | आरक्षित किंवा अनारक्षित (आरक्षित असल्यास ज्या सुनिश्चित प्रकारासाठी आरक्षित असेल तो गट नमूद करावा) | ज्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली त्याचे नांव व नियुक्ती दिनांक | नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा अ,ब,क, ड,इ मधील प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | इ | | | | |

मा.अध्यक्ष / मा.सचिव
सही व शिक्का

(टिप :— सदरचा बिंदुनामावली विहीत नमुना नोंदवहीत योग्य जागी चिटकविणेचा आहे.)

संस्थेचे नाव :—

महाविद्यालयाचे नाव :—

## महिलांसाठी सरळसेवा भरतीमध्ये ३०% आरक्षणानुसार माहितीचा तक्ता

| अ क्र | पदनाम | विषय | मंजूर पदे | अ. जा. | अ. ज. | वि जा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमा प्र | ईडब्ल्यु एस | अराखीव | एकुण | मंजुर पदावर प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या महिलांची एकुण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य/ संचालक | | | | | | | | | | | | | | |
| २ | सहायक प्राध्यापक ,ग्रंथपाल, शा.शि. संचालक | १ | | | | | | | | | | | | | |
| | | २ | | | | | | | | | | | | | |
| | | ३ | | | | | | | | | | | | | |
| | | ४ | | | | | | | | | | | | | |
| | | ५ | | | | | | | | | | | | | |
| एकुण | | | | | | | | | | | | | | | |
| एकुण (१+२) | | | | | | | | | | | | | | | |

मा. अध्यक्ष/मा. सचिव
सही व शिक्का

(टिप :— सदरचा बिंदुनामावली विहीत नमुना नोंदवहीत योग्य जागी चिटकविणेचा आहे.)